**प्रेस नोट दिनांक २२/०३/२०१९**

**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**अवैधपणे घातक शस्त्र तलवार जवळ बाळगले बाबत.**

दिनांक २१.३.२०१९ रोजी रात्री २२.०० वा. चे सुमारास वपोनि.कृष्णा इंदलकर यांचे आदेशान्वये पोलीस स्टेशन कडील तपास पथकाचे कर्मचारी पोशि.प्रशांत दुधाळ, पोहवा.५८२२, रोकडे, पोना.१९३८,जाधव पोशि.८७६७,विक्रांत सासवडकर असे पायी पेट्रोलींग फिरत असतांना गेरा बंगलो,खराडी,पुणे येथे रोडवर त्यांना एक इसम हातात तलवार घेवुन जात असताना दिसुन आल्याने त्यास जागीच शिताफिने पकडले. त्यास नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव आकाश किसन ओव्हाळ,वय-२६,रा.गोपाळपट्टी,मांजरी बुद्रुक,पुणे सध्या - शंबवी होम, बीजेएस मागे, बकोरी फाटा,वाघोली,पुणे असे सांगितले. त्याचेकडील तलवार किंमत रु. ३००/- ची पोहवा.५८२२,रोकडे यांनी जागीच पंचनाम्याने जप्त करुन ताब्यात घेतली आहे. त्याचेकडे सदर तलवार बाळगणेबाबत विचारता त्याने उडवाउडवीची उत्तरे देत असलेने व त्याने मा.सह पोलीस आयुक्त सो.पुणे शहर यांचे शस्त्र जवळ बाळगणेस मनाई आदेशाचा भंग केल्याने पोशि. प्रशांत दुधाळ यांनी त्याचेविरुध्द फिर्याद दिलेवरुन चंदननगर पोस्टे. गु.र.नं.१२५/१९, म.पो.अधि.कलम ३७(१)सह १३५ व आर्म ॲक्ट कलम ४(२५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरीलप्रमाणे वपोनि.कृष्णा इंदलकर व पोनि.गुन्हेटराजेंद्र काळे यांचे मार्गदर्शनाखाली आरोपी आकाश किसन ओव्हाळ याचेकडील तलवार इकडील पो स्टे चे कर्मचारी पोशि.प्रशांत दुधाळ, पोहवा.रविंद्र रोकडे, पोना.अमित जाधव पोशि.विक्रांत सासवडकर यांनी ताब्यात घेवुन त्याचे हातुन एखादा गंभीर स्वरुपाचा गुन्हा घडणेस प्रतिबंध करुन, चांगली कामगिरी केलेली आहे.